**CNR No :- MHSI100002022024**

## संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०७ सन २०२४
## निशाणी क्र. ०१ वरील आदेश

अभिलेखाचे अवलोकन करता, दि.०७.१०.२०२५ पासुन सदरचे प्रकरण अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ च्या साक्षीपुराव्या करीता नेमण्यात आलेले आहे. आजतागायत प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार यांना हजर ठेवण्यास अभियोग पक्ष अयशस्वी ठरला आहे. प्रस्तुत प्रकरण एकाच टप्प्यावर प्रदीर्घ कालावधीकरीता प्रलंबीत असल्याचे निदर्शनास येते. सरकार पक्षास साक्षीदारांची साक्ष नोंदविण्याकरीता उचित संधी उपलब्ध करुन देऊनही सरकार पक्षाने पुढील साक्षीदार तपासले नाहीत. साक्षीदारांना हजर ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी ही सरकार पक्षाची असताना असे साक्षीदार हजर न केल्याने सरकार पक्षास प्रस्तुत प्रकरणी स्वारस्य उरले किंवा कसे, असा प्रश्न निर्माण होतो. परंतु, तसा कोणताही आदेश पारीत करणेपुर्वी प्रस्तुत प्रकरणी न्यायहितार्थ एक संधी उपलब्ध करुन देणे न्यायोचित वाटते. सरकार पक्षाने पुढील तारखेपर्यंत प्रस्तुत प्रकरणी साक्षीदार हजर न केलेस योग्य तो आदेश पारीत करणेत येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
YASHODHAN
PRADEEP BAVKAR
Date: 2026.01.27
15:17:29 +0530

(वाय. पी. बावकर)
न्यायदंडाधिकारी वर्ग –१,
दोडामार्ग.

ठिकाण : दोडामार्ग.
दिनांक : २७/०१/२०२६.